महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र. मासं/रवका/न.क्र.५/२५०८१
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : ११.१०.२०२१

# परिपत्रक

**विषय: "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या कार्यक्रमांतर्गत शासकीय पत्रव्यवहारावर चिन्ह वापरण्याबाबत.**

**संदर्भ:** शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२१/प्र.क्र.१७७/सां.का.४ दि. ३०.०९.२०२१.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२१/प्र.क्र.१७७/सां.का.४ दि. ३०.०९.२०२१ अन्वये भारत देशाच्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त **"आजादी का अमृत महोत्सव"** या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत, महाराष्ट्र राज्यात, **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** या कार्यक्रमांतर्गत सर्व शासकीय कार्यालयांमध्ये शासकीय पत्रव्यवहारावर शासनाने सुनिश्चित केलेले चिन्ह वापरण्याबाबतच्या सुचना पारित करण्यात आलेल्या आहेत.

२. सबब, शासनाच्या दि. ३०.०९.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये **"आजादी का अमृत महोत्सव"** अर्थात **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** या योजनेंतर्गत सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या मंजूरीनुसार कंपनीच्या सर्व कार्यालयातील पत्रव्यवहार तसेच इतर ठिकाणी / विविध माध्यमांवर शासनाने सुनिश्चित केलेल्या खालील चिन्हाचा (Logo) वापर कटाक्षाने करण्यात यावा व सर्व कंपनीच्या कार्यालयांमध्ये दर्शनी भागात फलक (Banner) प्रदर्शित करण्यात यावेत असे सुचीत करण्यात येत आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

३. यास्तव, महाविरण कंपनीतील प्रशासकीय व क्षेत्रीय कार्यालयांमधील संबंधीत अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, शासन निर्णयामध्ये निर्गमित केलेलेल्या सुचनांचे अवलोकन करून त्याबाबत आपल्या स्तरावर अंमलबजावणी करण्यात यावी

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

**सोबत :** दि. ३०.०९.२०२१ रोजीचा शासन निर्णय.

(राजेंद्र पांडे)
**महाव्यवस्थापक (मासं-मासंव्यप्र)**

**प्रत सविनय सादर :**

१) संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
४) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) / (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
५) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
६) मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
७) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.
८) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.
९) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

**प्रत सस्नेह रवाना :**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
३) मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या कार्यक्रमांतर्गत
शासकीय पत्रव्यवहारावर चिन्ह वापरण्याबाबत

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२१/प्र.क्र. १७७/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० सप्टेंबर, २०२१

**वाचा** :- १) संस्कृति मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक २७ फेब्रुवारी, २०२१ रोजीचे पत्र

२) सूचना व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक ३ मार्च, २०२१ रोजीचे पत्र

**प्रस्तावना :-**

उपर्निर्दिष्ट क्र. १ व २ अन्वये, प्राप्त झालेल्या पत्रांच्या अनुषंगाने दिनांक १२ मार्च, २०२१ पासून स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त "आजादी का अमृत महोत्सव" या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत राज्यात विविध कार्यक्रमांच्या आयोजनास सुरुवात झाली. त्याअनुषंगाने, दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "आजादी का अमृत महोत्सव" अर्थात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या कार्यक्रमाचे आयोजनाबाबत विविध मंत्रालयीन अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांच्या समवेत बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत हा महोत्सव देशाच्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त केंद्र शासनाने सुचित केल्यानुसार १५ ऑगस्ट, २०२२ पर्यंतच्या ७५ आठवडयात ७५ कार्यक्रमाचे आयोजन राज्यभर जनसामान्यांना सामावून घेऊन करण्याबाबत सुचित करण्यात आले. सदर कार्यक्रमाचा प्रसार व प्रचार जास्तीत-जास्त माध्यमांचा वापर करुन करण्याचा शासनाचा मानस असून त्यानुषंगाने शासकीय पत्रव्यवहार तसेच इतर ठिकाणी विविध माध्यमांवर सुनिश्चित चिन्हाचा (Logo) वापर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"आजादी का अमृत महोत्सव" अर्थात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या योजनेंतर्गत शासनाच्या सर्व शासकीय पत्रव्यवहार तसेच इतर ठिकाणी / विविध माध्यमांवर परिशिष्ट - "अ" मध्ये सुनिश्चित केलेल्या चिन्हाचा (Logo) वापर करण्यात यावा.

२. सदर चिन्हाचा (Logo) शासकीय पत्रव्यवहारासाठी वापर करण्याचे कटाक्षाने पालन करावे. तसेच, सर्व शासकीय कार्यालयांमध्ये दर्शनी भागात बॅनर प्रदर्शित करण्यात यावेत. सर्व मंत्रालयीन / प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय

कार्यालयांना सदर बाब निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत योग्य त्या सूचना प्रसारीत कराव्यात.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०९३०१७३२०१६६२३ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. सभापती, विधान परिषद, विधान मंडळ, मुंबई
३. मा. अध्यक्ष, विधानसभा, विधान मंडळ, मुंबई
४. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
७. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
८. मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
९. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा यांचे सचिव
१०. सर्व विधान मंडळ सदस्य
११. सचिव, विधानसभा / विधान परिषद यांचे स्वीय सहाय्यक
१२. सर्व अपर मुख्य सचिव / मा. प्रधान सचिव / मा. सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१३. सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी /मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / आयुक्त, महानगर पालिका / मुख्याधिकारी, नगर पालिका
१४. सर्व क्षेत्रीय कार्यालय (मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत)
१५. सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१६. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१७. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई ४०० ०३२
१८. अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१९. निवड नस्ती, सां.का.४

शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२१/प्र.क्र. १७७/सां.का.४, दि. ३० सप्टेंबर, २०२१
सोबतचे "परिशिष्ट-अ"

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव